**आदेश निशाणी १९ खाली**

१. वादीने निशाणी क्र. १९ चा अर्ज मौजे हिंगणगांव, ता. कळंब, जि. उस्मानाबाद येथील जमीन गट क्रमांक ५८/३ चे सर्व क्षेत्र मोजुन त्याच्या हद्दी खुणा कायम करण्याकरीता उप अधिक्षक, भूमी अभिलेख, कळंब यांची नेमणूक करण्याबाबत दाखल केला आहे.

२. अर्ज व त्यावरील प्रतिवादींच्या निशाणी क्र. २२ कडील म्हणण्याचे अवलोकन केले. वादीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, वादीने सदरचा दावा कब्जा मिळण्याबाबत दाखल केला असुन प्रतिवादींनी वादीच्या मिळकतीत बांध काढुन अतिक्रमण केले आहे. दावा हा कब्जा मिळण्याबाबत असल्यामुळे मौजे हिंगणगांव, ता. कळंब, जि. उस्मानाबाद येथील जमीन गट क्रमांक ५८/३ चे सर्व क्षेत्र मोजुन त्याच्या हद्दी खुणा कायम करून त्याची मोजणी करण्यासाठी उप अधिक्षक, भूमी अभिलेख, कळंब यांची न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमणुक करून त्यांचा अर्ज मंजुर करण्यात यावा.

३. याउलट, प्रतिवादींतर्फे वकीलांनी असा युक्तीवाद केला आहे की, प्रस्तुत अर्जामध्ये वादीने वादमिळकतीच्या चतु:सिमेचा उल्लेख केला नाही. वाद मिळकतीच्या सर्व सह हिस्सेधारकांचा देखील समावेश वादीने दाव्यात केलेला नाही. वाद मिळकतीचा मोजणी खर्च कोण करणार याचाही उल्लेख अर्जात नाही. वादीस मोजणी करावयाची असल्यास तो स्वत: अर्ज देवुन संबंधीतांकडुन मोजणी करून घेवू शकतो. प्रकरणात केवळ विलंब लागावा म्हणुन सदरचा अर्ज पुरावा गोळा करण्याच्या हेतुने वादीने दिलेला असल्यामुळे तो नामंजुर करण्यात यावा.

४. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुत दावा हा वाद मिळकतीचा कब्जा मिळण्याबाबत वादीने दाखल केलेला दिसतो. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादी व प्रतिवादी यांच्या जमीनी मौजे हिंगणगाव ता. कळंब, जि. उस्मानाबाद येथील गट क्र. ५८/३ या एकाच गटात असल्याचे दिसतात.

हे कायद्याचे प्रस्थापित तत्व आहे की, मोजणी, हद्दीखुणा, मिळकतीची ओळख, अतिक्रमण व कब्जा बाबत वाद असल्यास न्यायालयीन आयुक्ताची नियुक्ती करता येते. तसेच पुरावा गोळा करण्याकरीता न्यायालयीन आयुक्ताची नियुक्ती करू नये. प्रस्तुत अर्जाचे अवलोकन केले असता वादीने सदरचा दावा वाद मिळकतीचा कब्जा मिळण्यासाठी दाखल केला आहे. तसेच त्याने प्रतिवादींनी वाद मिळकतीतील बांध काढुन अतिक्रमण केल्याचे म्हटले आहे. त्यामुळे दावा निकाली काढण्यासंबंधाने वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद पुर्णपणे संपुष्टात आणण्याकरीता वादमिळकतीची मोजणी करण्याकरीता उप अधिक्षक, भुमी अभिलेख, कळंब यांची नियुक्ती करणे आवश्यक वाटते. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे, करीता खालील प्रमाणे आदेश.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज निशाणी १९ मंजूर करण्यात येतो.

२. उप अधिक्षक, भूमी अभिलेख, कळंब यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात येते. त्यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी मौजे हिंगणगांव, ता. कळंब येथील गट क्र. ५८/३ मधील संपुर्ण गटाच्या क्षेत्राची मोजणी करावी व प्रत्येक खातेदारांच्या हद्दी खुणा कायम करून नकाशासह आपला अहवाल या न्यायालयात लवकरात लवकर सादर करावा.

३. वादीने गट क्र. ५८/३ च्या मोजणीचा खर्च संबंधीत कार्यालयात भरावा व आवश्यक ते कागदपत्रे दाखल करावीत.

४. उप अधिक्षक, भूमी अभिलेख, कळंब यांनी दोन्ही पक्षकारांना, संबंधीत गटातील खातेदारांना पुर्व नोटीस देवून कमिशनचे काम करावे.

५. संबंधीतांनी प्रोसेस फी भरल्यानंतर कमीशन रिट पाठविण्यात यावे.

**६**. उपअधिक्षक, भुमी अभिलेख, कळंब यांना निर्देशीत करण्यात येते की, सदर मोजणी संबंधी कामात काही त्रुटी आढळल्यास त्यांनी या न्यायालयास उचित वाटल्यास आवश्यक पत्रव्यवहार करावा व त्यांनी वरील आदेश क्र. ०२ मधील आदेशाची तंतोतंत अंमलबजावणी करावी.

स्वाक्षरीत/-

.दिनांक : १७.०४.२०१७

**( प्रि.म. पाटील )**
सह दिवाणी न्यायाधीश,
क.स्तर, कळंब.